आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ जुलै २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- देशभरात विविध ठिकाणी झालेल्या रोजगार मेळाव्यातून ५१ हजार युवकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत शिकवणी वर्ग हे अडथळे असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं मत

- भारताच्या न्यायव्यवस्थेत मोठ्या सुधारणांची गरज असल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचं प्रतिपादन

- दिल्लीत इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत १० जणांचा मृत्यू

आणि

- विम्बल्डनमध्ये महिला एकेरीच्या अंतिम फेरीत आज इगा श्वियांतेक आणि अमांडा ॲनिसिमोव्हा आमनेसामने

**<><><><>**

युवकांचं सक्षमीकरण आणि विकसित भारतात त्यांचं योगदान वाढवण्यासाठी रोजगार मेळावे महत्त्वाची भूमिका बजावतात असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. देशभरात ४७ ठिकाणी आयोजित १६व्या रोजगार मेळाव्याला ते संबोधित करत होते. त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे विविध सरकारी विभागांत नव्यानं नियुक्त झालेल्या युवकांना ५१ हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण केलं. या उपक्रमामुळे लाखो तरुणांना केंद्र सरकारमध्ये कायमस्वरूपी नोकऱ्या मिळाल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात स्टार्टअप्स, नवोन्मेष आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये वाढ होत असल्यामुळे देशातल्या तरुणांच्या क्षमताही वाढत असल्याचं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- नरेंद्र मोदी***

खाजगी क्षेत्रात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर सरकारचा भर असून सरकारनं रोजगाराशी संबंधित प्रोत्साहन योजना ही एक नवीन योजना मंजूर केली

असल्याचं मोदी यांनी नमूद केलं. उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात मिशन मॅन्युफॅक्चरिंगची घोषणा करण्यात आली असल्याचं ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर इथून या कार्यक्रमात भाग घेतला. पुण्यातल्या रोजगार मेळाव्यात नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं.

**<><><><>**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत शिकवणी वर्ग हे अडथळे आहेत असं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मांडलं. ट्रिपल आयटी कोटाच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. शिकवणी वर्गांच्या जाहिरातींवरही त्यांनी आक्षेप घेतला. या जाहिरातींसाठी पैसा कुठून येतो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या समस्येवरही त्यांनी चिंता व्यक्त केली. पारंपरिक मार्ग वगळून इतर नव्या क्षेत्रातल्या संधींकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><>**

भारताची न्यायव्यवस्था विलक्षण आव्हानात्मक परिस्थितीत आहे आणि त्यात मोठ्या सुधारणांची गरज आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज केलं. हैदराबादमध्ये नालसार विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. वर्षानुवर्षं चालणारे खटले आणि तुरुंगात खितपत पडलेल्या आरोपींची अवस्था ही चिंतेची बाब असल्याचंही ते म्हणाले. न्यायमूर्ती गवई यांनी भावी कायदेतज्ज्ञांना जबाबदारीनं आणि प्रामाणिकपणे न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याचं आवाहन केलं. परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन पालकांवर आर्थिक बोजा टाकू नका, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

**<><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं काम ३० सप्टेंबरपूर्वी पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांनी या विमानतळाची पाहणी केली आणि धावपट्टीपासून ते टर्मिनल इमारतीपर्यंतच्या प्रगतीची माहिती घेतली. त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. हा देशातला सगळ्यात अद्ययावत

प्रकल्प ठरणार असून या विमानतळाचं ९४ टक्के काम पूर्ण झालं आहे. धावपट्टी आणि टर्मिनल इमारतीचं कामही पूर्ण झालं आहे. आता आतल्या भागाचं काम सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><>**

दिल्लीतल्या सीलमपूर इथं आज सकाळी एक चार मजली इमारत कोसळून १० जणांचा मृत्यू झाला. पोलीस, एनडीआरएफ आणि स्थानिकांच्या मदतीनं बचावकार्य सुरू आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दिल्ली सरकारचे मंत्री कपिल मिश्रा यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. इमारतीजवळची गल्ली अरुंद असल्यानं बचावकार्यात अडथळे येत असल्याचं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या दुर्घटनेत मृत्यूमुखी पावलेल्यांबद्दल समाज माध्यमांतून शोक व्यक्त केला आहे.

**<><><>**

अहमदाबादमध्ये गेल्या महिन्यात झालेल्या एअर इंडिया विमान अपघात प्रकरणी विमान अपघात तपास यंत्रणेनं काल १५ पानांचा प्राथमिक अहवाल प्रकाशित केला आहे. उड्डाण सुरू झाल्यानंतर काही सेकंदातच विमानाचं इंजिन इंधन नियंत्रण 'RUN' मोड वरून 'CUTOFF' स्थितीत गेलं आणि बंद झालं, परिणामी ही दुर्घटना घडली असं या अहवालात म्हटलं आहे. या अपघातात २६० जणांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या विमान अपघाताच्या चौकशीत अधिकाऱ्यांना सहकार्य करत राहू, असं एअर इंडियानं म्हटलं आहे.

**<><><>**

रशियाने आज युक्रेनमधल्या अनेक शहरांना लक्ष्य करत ६०० ड्रोन आणि २६ क्षेपणास्त्रं डागत मोठा हवाई हल्ला केला. या महिन्यातला रशियाचा हा चौथा मोठा हल्ला आहे. या हल्ल्यांमध्ये लवीव, लुत्स्क आणि चेर्नित्सि या पश्चिमेकडच्या शहरांचं सर्वाधिक नुकसान झालं. रोमानियाच्या सीमेलगतच्या चेर्नित्सि शहरात दोन जण ठार तर २० जखमी झाले. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे.

दरम्यान, रशियाची २५ क्षेपणास्त्रं आणि ३१९ ड्रोन पाडल्याचा दावा युक्रेनच्या हवाई दलानं केला आहे, तर युक्रेनचे १५५ ड्रोन पाडल्याचा दावा काल रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं केला. अमेरिकेने युक्रेनला पुन्हा फौजफाटा पुरवण्याची सुरुवात केल्याच्या पार्श्वभूमीवर रशियानं हा ताजा हल्ला केला आहे.

<><><><>

डॉमिनिकन रिपब्लिक इथं कॅरिबिअन समुद्रात बोट बुडून किमान ४ जणांचा मृत्यू झाला, तर सुमारे २० जण बेपत्ता झाले. इतर १७ जणांना वाचवण्यात यश आल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><>

अमेरिकेनं परराष्ट्र सेवेतल्या सुमारे एक हजार कर्मचाऱ्यांना काढून टाकलं आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला. ट्रम्प सरकारच्या व्यापक पुनर्रचना मोहिमेमुळे या वर्षाच्या सुरुवातीला पंधराशेहून अधिक कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने नोकरी सोडली होती.

<><><><>

भारत आणि इंग्लडदरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेत तिसऱ्या सामन्यात चुरस निर्माण झाली आहे. लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या दिवशी भारतानं ३ गडी बाद १४५ धावांवरून पुढे खेळायला सुरुवात केली. के. एल. राहुल कसोटीतलं दहावं शतक झळकावून बाद झाला. तर रिषभ पंतने ७४ धावा फटकावल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ५ गडी बाद ३११ धावा झाल्या होत्या.

<><><><>

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंडच्या संघांदरम्यान पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेतला पाचवा सामना आज रात्री होणार आहे. ही मालिका भारतानं ३-१ अशी जिंकली आहे. आजचा सामना जिंकून यात एका विजयाची भर घालायचा भारताचा प्रयत्न आहे. हा सामना रात्री ११ वाजता बर्मिंगहॅम इथं सुरू होईल.

<><><><>

जगातल्या दीडशेहून जास्त देशांमधल्या एकंदर ३३ कोटी लोकांना धुळीच्या किंवा वाळूच्या वादळांमुळे आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्याच्या समस्यांना सामोरं जावं लागत असल्याचं जागतिक हवामान संघटनेनं म्हटलं आहे. दरवर्षी सुमारे २ अब्ज टन धूळ निर्माण होते. यातली ८० टक्के धूळ उत्तर अमेरिका आणि पश्चिम आशियात तयार होऊन सर्वत्र पसरतात. या भागात यामुळे दरवर्षी सुमारे दीडशे अब्ज डॉलर्सचं नुकसान होतं, असंही

संघटनेनं म्हटलं आहे. १२ जुलै हा या संकटाचा सामना करण्याचा दिवस म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनं घोषित केला असून पुढचं एक दशक यावरच्या उपायांसाठी समर्पित केलं आहे.

**<><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात इगा श्वियांतेक हिच्यासमोर अमांडा अनिसिमोव्हा हिचं आव्हान असेल. भारतीय वेळेनुसार हा सामना रात्री साडेआठला सुरु होईल. तर उद्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात अग्रमानांकित यानिक सिनर आणि गतविजेता कार्लोस अल्काराज एकमेकांविरुद्ध मैदानात उतरतील. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सिनर यानं नोव्हाक जोकोविचवर ६-३, ६-३, ६-४ अशी सहज मात केली, तर दुसऱ्या सामन्यात अल्काराज यानं टेलर फ्रिट्झचा ६-४, ५-७, ६-३, ७-६ असा पराभव केला.

**//<><><><>//**